| MHNG090014772017 | - न्या य नि र्ण य -<br>(दिनांक १० मार्च, २०२६ रोजी पारित) |
|---|---|

प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द मद्य निषेद कायद्याचे कलम ८५ प्रमाणे चालवण्यात आला.

०२) अभियोगपक्षातर्फे आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरिता तपास अधिकारी पोलीस हवालदार श्री. प्रभाकर भोयर (सा.क्र.१) यांची साक्ष निशाणी क्र. ०६ वर नोंदवण्यात आली आहे. निशाणी क्र.१ वरील दिनांक १०.०३.२०२६ रोजीच्या आदेशान्वये अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

०३) अभियोगपक्षातर्फे वि. सहाय्यक सरकारी वकील श्रीमती. एच. ए. डेकाटे व आरोपीतर्फे वकील श्री. पी. एम. माहेश्वरी यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील एकंदरीत मौखिक व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता खालील मुद्दे माझ्या विचाराधीन आहेत व त्यावरील निष्कर्ष मी खालील कारणमिमांसेद्वारे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले आहे का की, दिनांक २८.०३.२०१७ रोजी वार्ड क्र. १, दहेगाव रंगारी, ता. सावनेर, जि. नागपूर येथे आरोपी दारूच्या नशेत धुंद अवस्थेत येणा-या जाणा-या लोकांना शिवीगाळ करतांना मिळून आला ? | ...नकारार्थी. |
| ०२. | काय आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

मुद्दा क्रमांक ०१ बाबतः-

०४) आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षास दिनांक

२८.०३.२०१७ रोजी वार्ड क्र. १, दहेगाव रंगारी, ता. सावनेर, जि. नागपूर येथे आरोपी दारूच्या नशेत धुंद अवस्थेत येणा-या जाणा-या लोकांना शिवीगाळ करतांना मिळून आला, ही बाब सिध्द करणे गरजेचे आहे.

०५) त्याअनुषंगाने अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले तपास अधिकारी पोलीस हवालदार श्री प्रभाकर भोयर (सा.क्र.१) यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, दि. २८.०३.२०१७ रोजी ते पोलीस ठाणे खापरखेडा येथे कार्यरत होते. त्यादिवशी ते इतर पोलीस सहका-यांसह घटनास्थळी गेले. आरोपीच्या घरासमोर गेले तेव्हा आरोपी दारूच्या नशेत शिवीगाळ करत होता. त्यास ताब्यात घेतले व वैद्यकीय तपासणीकरिता पाठवले. त्यानंतर अवस्थी साहेबांनी आरोपीविरुध्द प्रथम खबरी अहवाल दाखल केला. त्यांनी आरोपीला अटक केली. साक्षीदारांचे बयाण नोंदविले व आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. त्यांनी त्यांच्या उलटतपासात नकारार्थी उत्तरे दिली.

०६) अभियोगपक्षाने ईतर कोणताही स्वतंत्र साक्षीदार तसेच फिर्यादीला तपासलेले नाही. आरोपीविरुध्दचा दोषारोप शाबीत करण्याकरिता अभिलेखावर कोणताही पुरावा उपलब्ध नाही. अशाप्रकारे, अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप निःसंशयपणे व सबळ पुराव्याद्वारे सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. आरोपी दारूच्या नशेत सार्वजनिक ठिकाणी येणा-या जाणा-या लोकांना शिवीगाळ करतांना मिळून आला, हे सिध्द झालेले नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.०१ करिता 'नकारात्मक' निष्कर्ष नोंदवते.

मुद्दा क्रमांक ०२ बाबतः-

०७) मी मुद्दा क्र.०१ करिता नकारात्मक निष्कर्ष नोंदविल्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

| -- आ दे श -- | |
|---|---|
| ०१. | आरोपी अनंता लहुजी भोयर याची मद्य निषेद कायद्याचे कलम ८५ अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या आरोपांमधून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| ०२. | आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते. |

| | |
|---|---|
| ०३. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ ची पुर्तता करावी. |
| | **(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात दिला असून जाहीर करण्यात आला.)** |

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.03.11 16:15:36 +0530

दिनांक – १०.०३.२०२६
सावनेर.

**(एस.एम.गाडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.०३, सावनेर, जि. नागपूर.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF judgment are same word to word, as per the original judgment.

Name of Stenographer :- D. R. Aglawe

## ENDORSEMENT

| | | |
|---|---|---|
| Case Argued on | : | 10.03.2026 |
| Judgment dictated on | : | 10.03.2026 |
| Judgment checked and signed on | : | 10.03.2026 |